# SACRIFICE 316

# जिवंत बलिदान

*"म्हणून बंधुजनहो, मी देवाच्या करुणांमुळे तुम्हांला विनवतो की, तुम्ही आपली शरीरे जिवंत, पवित्र व देवाला ग्रहणीय यज्ञ म्हणून समर्पण करावीत; ही तुमची आध्यात्मिक सेवा आहे. देवाची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे हे तुम्ही समजून घ्यावे, म्हणून ह्या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रूपांतर होऊ द्या."* रोम 12:1-2

**तुमचे यज्ञरुपी बलिदान.** आपले शरीर *"जिवंत व पवित्र यज्ञ"* म्हणून अर्पण करावयासाठीचा हा उपदेश अनेकदा चुकीच्या प्रकारे समजला जातो. तथापि, केवळ येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणारा न राहता त्याही पलीकडे जाण्याचा योग्य मार्ग समजून घेण्यासाठी हे अत्यंत महत्त्वाचे आहे. पहिले वचन प्रत्येक विश्वासणाऱ्याला तारणानंतर परमेश्वराला एक विशिष्ट यज्ञरुपी बलिदान करावयाचे आव्हान देते. दुसरे वचन त्या यज्ञरुपी बलिदानानंतरचे जीवन कसे जगावे, याबद्दल मार्गदर्शन करते. लूक 9:23 मध्ये सांगितल्याप्रमाणे, दररोज आपला वधस्तंभ उचलण्याचा भाग म्हणून दररोज परमेश्वराच्या अधीन व्हा. तथापि, रोम 12:1 चा उद्देश तो नाही. *"आपली शरीरे . . . यज्ञ म्हणून समर्पण करावीत"* हा आदेश म्हणजे परमेश्वराला *एकदाच आणि कायमचे* समर्पण, शरणागती आणि पूर्ण अधीन करणे होय. हे तारण नाही. तारण हे पूर्णपणे ख्रिस्ताच्या बलिदानावर आधारित आहे. हे त्यापेक्षा वेगळे आहे. हे तुमचे यज्ञरुपी बलिदान आहे. हे दररोजचे यज्ञरुपी बलिदान नाही. हे म्हणजे परमेश्वराला आपले जीवन बिनशर्त आणि कायमचे जिवंत, पवित्र व ग्रहणीय यज्ञरुपी बलिदान म्हणून समर्पण करणे होय. ही स्वतःला परमेश्वराच्या गौरवासाठी आणि त्याच्या अनिर्बंधित उपयोगासाठी स्वेच्छेने दिलेली तुमची यज्ञ-भेट आहे.

**हे यज्ञरुपी बलिदान का करावयाचे?** हे त्याच्या दयेमुळे आहे. रोमकरांस पत्राचे 1-11 अध्याय परमेश्वरीय दयेचे वर्णन करतात. रोम 12:1 तुम्हांला सांगते की, त्या दयेमुळे परमेश्वराची तुमच्याकडून काय अपेक्षा आहे. रोम 12:2 यज्ञरुपी बलिदाना *नंतरच्या* तुमच्या जीवनासाठी दोन विनंत्या करतात. परमेश्वराने तुमचे तारण केले आणि तुम्हांला पवित्र केले आहे या त्याच्या महान दयेचे वर्णन पहिल्या अकरा अध्यायांत केले आहे. म्हणून, स्वतःला परमेश्वरापुढे सादर करा. तो तुम्हांला या जीवनात आणि अनंतकाळासाठीही आशीर्वादित करेल. तथापि, तुमच्या यज्ञरुपी बलिदानाची योग्य प्रेरणा तुमच्या पुढे नाही. ती तुमच्या मागे आहे. तुमची खरी प्रेरणा परमेश्वराने तुमच्यासाठी आधीच जे केले आहे, त्यावर आधारित आहे. कल्पना करा की, येशू आपले खिळ्यांचे व्रण असलेले हात तुम्हांला दाखवून म्हणतो, "मी तुझ्यासाठी इतके केले आहे; म्हणून तू माझ्यासाठी हे कर." याचाच अर्थ रोम 12:1 मध्ये आहे.

**हे यज्ञरुपी बलिदान 'एकदाच' का करावयाचे?** कारण रोम 12:1-2 मधील शब्दांचा मूळ अर्थ तोच आहे. 12:2 मधील *"ह्या युगाबरोबर समरूप होऊ नका"* आणि *"स्वत:चे रूपांतर होऊ द्या"* ही क्रियापदे वर्तमानकाळात आहेत. याचा अर्थ या दोन गोष्टी आता करा आणि आयुष्यभर करत राहा. परंतु 12:1 मधील *"आपली शरीरे . . . यज्ञ म्हणून समर्पण करावीत"* ही क्रिया ग्रीक भाषेत साध्या वर्तमानकाळात नाही. ग्रीक भाषेत, त्याचा अर्थ एकमेव कृती करणे आहे. त्याचा अर्थ तीच करत राहा असा नाही. त्याचा अर्थ—एकदाच आणि कायमची करा असा आहे. हे म्हणजे स्वतःला दृढनिश्चयाने परमेश्वराला समर्पित करणे होय. स्वतःला त्याच्यासाठी यज्ञरुपी बलिदान म्हणून अर्पण करा. रोम 12:1 हे तुमच्या यज्ञरुपी बलिदाना बद्दल आहे. ते म्हणजे स्वतःला कायमचे परमेश्वराच्या वेदीवर अर्पण करण्याबद्दल आहे.

**दोन उदाहरणे.** अनुवाद 15:12-17 मध्ये यासाठी एक उदाहरण दिलेले आहे. मुक्त केलेला एखादा इब्री दास *स्वेच्छेने* आणि *कायमचा पुन्हा* आपल्या स्वामीचा पुन्हा दास होण्याचा निर्णय घेऊ शकत होता. तो निर्णय स्वामीने पूर्वी दाखविलेल्या दयेवर आधारित असायचा. तो दासाच्या आपल्या स्वामीवरील प्रेमामुळे प्रेरित असायचा. तो निर्णय कायमचा असे. त्या दासाचे कान टोचण्यासाठी सुळ्याचा वापर केला जात असे, ज्यातून तो आयुष्यभर त्या स्वामीचा सेवक आहे हे दर्शविले जात असे. ही दास्याची स्थिती त्या दासाने स्वतः निवडलेली असायची. ती त्याच्यावर जबरदस्तीने लादलेली नसे. तो एक कायमचा निर्णय असायचा. दुसरे उदाहरण जुन्या करारातील प्राण्यांच्या यज्ञांमध्ये आढळते. वेदीवर अर्पण करण्यासाठी प्राणी स्वीकारार्ह असणे आवश्यक होते. आजारी किंवा दोष असलेला प्राणी स्वीकारार्ह नव्हता (लेवीय 1-5). हे तुमच्या रोम 12:1 मधील यज्ञाच्या पवित्र व परमेश्वराला ग्रहणीय या भागाचे स्पष्टीकरण देते. बलिदान केलेला प्राणी मृत असणे हे त्या यज्ञरुपी बलिदानाचे कायमस्वरूपी उदाहरण आहे. वेदी तापल्यावर कोणताही यज्ञीय प्राणी वेदीवरून रांगत खाली उतरून पळून जात नसे. तसेच, कोणताही याजक दिवसाच्या शेवटी एखादा प्राणी परत नेऊन तो दुसऱ्या दिवशी पुन्हा अर्पण करण्यासाठी ठेवत नसे. तो एक कायमचा यज्ञ असे. वेदी गरम झाली म्हणून जर तुम्ही तुमचे रोम 12:1 मधील बलिदान वेदीवरून खाली काढले, तर ते कधीच रोम 12:1 चे खरे बलिदान नव्हते.

**तुमचे यज्ञरुपी बलिदान पुन्हा करणे.** रोम 12:1 मधील यज्ञरुपी बलिदान तुम्हाला कधी पुन्हा करावयाचे आहे का? हो, जर तुमचा यज्ञ स्वीकारार्ह नसेल तर. रोम 12:1 मधील यज्ञ जिवंत, पवित्र व परमेश्वराला ग्रहणीय यज्ञ असणे आवश्यक आहे. तुम्ही जिवंत आहात, कारण ख्रिस्तावर विश्वास ठेवल्यावर तुम्ही *"मरणातून जीवनात पार गेला आहात,"* योहान 5:24. एक पवित्र यज्ञरुपी बलिदान असणे ही तुमची जबाबदारी आहे. जुन्या करारातील प्राणी बलिदानासाठी स्वीकारार्ह असणे आवश्यक होते. कोणताही प्राणी पूर्णपणे निर्दोष असू शकत नाही. परंतु तो प्राणी रोगमुक्त, निरोगी आणि दोषरहित असणे आवश्यक होते. यावरून रोम 12:1 मधील यज्ञासाठी दोन गोष्टी स्पष्ट करते. पहिले म्हणजे, तुमचे बलिदान रोगमुक्त असले पाहिजे. पापाचा आणि परमेश्वरापासून ताटातुटीचा जो आजार आहे, तो तारणाद्वारे बरा झाला पाहिजे. म्हणूनच रोम 12:1 हे फक्त विश्वासणाऱ्यांना लिहिलेले आहे (त्या वचनात "बंधूंनो" हा शब्द याचे संकेत देतो). अविश्वासणाऱ्यांचे बलिदान स्वीकारार्ह नसते, कारण ते *तारणानंतर* अर्पण केले गेले पाहिजे, *तारणापूर्वी* नाही. तुम्ही येशूचे अनुसरण करण्यापूर्वी त्याच्याकडे येणे गरजेचे आहे.. तुमच्या तारणाची खात्री करण्यासाठी www.Gospel316.org. या संकेतस्थळाला भेट द्या. हा पवित्र भाग विश्वासणाऱ्यांच्या जीवनातील आत्मिक शुद्धतेच्या स्वीकारार्ह स्तराकडे निर्देश करतो. तेव्हाच तुमचे रोम 12:1 मधील यज्ञरुपी बलिदान परमेश्वराला स्वीकारार्ह ठरेल. *"म्हणून जर कोणी त्यांपासून दूर राहून स्वत:ला शुद्ध करील, तर तो पवित्र केलेले, स्वामीला उपयोगी पडणारे, प्रत्येक चांगल्या कामास तयार केलेले, असे मानाचे पात्र होईल"* 2 तीमथ्य 2:21. तुम्ही परिपूर्ण असू शकत नाही. तथापि, तुम्ही आत्मिक आरोग्य आणि पवित्रतेच्या योग्य स्तरावर स्वतःला परमेश्वरापुढे सादर करू शकता. तुमचे जिवंत आणि पवित्र यज्ञरुपी बलिदान परमेश्वराने स्वीकारल्यानंतर तुम्हांला ते पुन्हा कधी अर्पण करण्याची गरज नाही. परंतु जर तुमचे यज्ञरुपी बलिदान तात्पुरते होते किंवा ते पवित्र नव्हते म्हणून परमेश्वराला स्वीकारार्ह नव्हते, तर ते पुन्हा अर्पण करणे आवश्यक आहे. स्वतःला कायमचे, जिवंत आणि पवित्र यज्ञरुपी बलिदान म्हणून अर्पण करा. दास असे स्वतःला स्वेच्छेने आणि कायमचे परमेश्वराच्या अधीन करा. हे हलक्या मनाने करू नका. तारणानंतरचा हा एक अत्यंत गंभीर निर्णय आहे. तुमचे यज्ञरुपी बलिदान परमेश्वराने स्वीकारल्यानंतर, येशू ख्रिस्ताचा खरा अनुयायी म्हणून रोम 12:2 मध्ये सांगितलेल्या या जगासारखे न होण्याच्या आणि रूपांतरित जीवनाकडे पुढे चला. त्याने तुमच्यासाठी जे काही केले आहे, त्या बदल्यात तुम्ही हे त्याच्यासाठी करा!

**यज्ञरुपी बलिदानानंतरचे तुमचे जीवन.** "*देवाची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे हे तुम्ही समजून घ्यावे, म्हणून ह्या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रूपांतर होऊ द्या.*" रोम 12:2. हे वचन तुमच्या रोम 12:1 मधील यज्ञरुपी बलिदानानंतरच्या जीवनासाठी उत्तेजना देते. हा उपदेश वर्तमानकाळात आहेत, म्हणजे जगाप्रमाणे न बनता आणि सतत आपल्या मनाच्या नूतनीकरणाद्वारे स्वतःला रूपांतरित करत राहा. या जगातील पापी आचरणांशी जुळवून घेऊ नका, त्यांना संमती देऊ नका. एक विश्वासणारा म्हणून तुमचे व्यक्तिमत्व जगाला ठरवू देऊ नका. रोम 12:2 तुम्हांला *"आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रूपांतर होऊ द्या"* अशी उत्तेजना देते. ग्रीक भाषेत *"रूपांतर"* असा अनुवाद केलेला शब्द तोच आहे जो मत्तय 17:2 आणि मार्क 9:2 मध्ये येशूबद्दल वापरला आहे, जिथे म्हटले आहे की त्याचे *"रूपान्तर झाले"* रोम 12:2 हे आपल्या मनाच्या नूतनीकरणाने (नूतनीकरण म्हणजे सुधारणा, अधिक चांगल्यासाठी संपूर्ण बदल) रूपांतरित होण्याचे आवाहन आहे. ही रूपांतरणाची प्रक्रिया (अळीचे फुलपाखरू होण्यापेक्षाही अधिक अद्भुत आहे) तुम्ही जेव्हा परमेश्वराचे वचन शिकता आणि त्यानुसार जगता, तेव्हा घडून येते. रोम 12:1 तुम्ही स्वतःला यज्ञरुपी बलिदान असे करा. जगाच्या साच्यात स्वतःला अडकवू नका. परमेश्वराचे वचन शिकताना आणि त्यानुसार जगताना रूपांतरित व्हा. मग तुम्हांला परमेश्वराची इच्छा ओळखता येईल आणि त्यानुसार जगता येईल.

**"म्हणून ह्या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रूपांतर होऊ द्या." रोम 12:2**

*जिवंत बलिदान* © 2026 John D. Morris III यांचे लेखन असून ते Acts One Eight द्वारे प्रकाशित केले गेले आहे. या साहित्यातील आशयात कोणताही बदल न करता आणि हा संपूर्ण मजकूर समाविष्ट करून, तुम्ही याचे मुक्तपणे मुद्रण, प्रत, पोस्ट, ईमेल किंवा संदेशाद्वारे वितरण करू शकता. तुम्ही पहिल्या पानाच्या वर तुमच्या सेवाकार्याचे किंवा मंडळीचे नाव किंवा लोगो जोडू शकता, तसेच दुसऱ्या पानाच्या खालच्या बाजूला असलेल्या सलग रेषेच्या वर तुमची संपर्क माहिती जोडू शकता. *Sacrifice316* हे केवळ पवित्र शास्त्रावर आधारित आहे. येशूवर केवळ विश्वास ठेवण्यापलीकडे जाऊन लोकांची आत्मिक प्रगती व्हावी, यासाठी हे कार्य अस्तित्वात आहे. तुम्ही Acts One Eight ला (शक्य असल्यास इंग्रजीमध्ये) या पत्त्यावर ईमेल करू शकता: Hello@Mail316.org. अनुवाद सेवा www.ChristianLingua.com. द्वारे पुरवण्यात आली आहे. *जिवंत बलिदान* हे 48 भाषांमध्ये मोफत उपलब्ध आहे: www.Sacrifice316.org. मराठी आवृत्तीतील उद्धरणे The Lockman Foundation यांच्या New American Standard Bible 1995 मधून घेतली आहेत. या भाषांतरातील पवित्र शास्त्रातील उद्धरणे-पवित्र शास्त्र RV (Re-edited) Bible (BSI) MARVBSI मधून घेतली आहेत.